www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक

# युवक आधार

मराठी





मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 351 शुक्रवार दि. 05 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6

RNI MAHMAR/2023/89514

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्ष पदार्पणनिमित्त रविवारी वावर्ले येथे रक्तदान शिबिर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )**



दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे ७५ व्या वर्षात पदार्पण अर्थात अमृत महोत्सव वर्षनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी रक्तदान शिबिर उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चा खालापूर मंडलाच्या वतीने रविवार दिनांक ०७ सप्टेंबर रोजी खालापूर तालुक्यातील वावर्ले येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमिताने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील रक्ततुटवडा भरून काढण्यासाठी एक विशेष "रक्तदान उपक्रम" सुरु करण्यात आले आहे. त्यामध्ये दर महिन्याच्या पहिल्या रविवारी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे. हा उपक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असून, विशेषतः थॅलेसिमिया ग्रस्त रुग्णांसाठी आणि इतर गरजू रुग्णांसाठी या रक्तदान उपक्रमाचे मोठे योगदान ठरणार आहे. आतापर्यंत पनवेल, खारघर आणि खांदा कॉलनी येथे हे शिबीर यशस्वी आयोजन आणि उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले. वावर्ले येथे होणारे हे शिबीर मालिकेतील चौथे असून अधिक माहितीसाठी मनोज पारठे ९०९६१८९५५५, निखिल पाटील ७०८३१३१००, भरत मांडे ८८९८१७३२३५, किंवा स्वप्निल ठोंबरे ९२०९८७६२९५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# "लहान मुलांची टॉफीही...",

## जीएसटी सुसूत्रीकरणावर पंतप्रधान मोदींची पहिली प्रतिक्रिया; काँग्रेसला केलं लक्ष्य

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वस्तू आणि सेवा कराच्या (जीएसटी) सुसूत्रीकरणावर बोलताना प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसवर जोरदार टीका केली आणि म्हटले की, काँग्रेसने दैनंदिन जीवनावश्यक वस्तू, अन्न आणि औषध यासारख्या वाटेल त्या गोष्टींवर कर लादला होता. दरम्यान, जीएसटी सुसूत्रीकरणावर काँग्रेसने टीका केली आहे. काँग्रेसने म्हटले आहे की, केंद्र सरकारने जीएसटीमध्ये आठ वर्षे उशिराने सुसूत्रीकरण आणले आहे. बिहारमधील येत्या विधानसभा निवडणुका आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या ५० टक्के टॅरिफसह अनेक मुद्द्यांवर अंदाज लावत, या अचानक उचललेल्या पावलामागे काय काय आहे, असा प्रश्नही काँग्रेसने उपस्थित केला आहे.




जीएसटी सुसूत्रीकरण आणि काँग्रेसच्या टीकेला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, "मी २०१४ मध्ये सत्तेत येण्यापूर्वी, स्वयंपाकघरातील भांडी असोत किंवा शेतीच्या वस्तू असोत, औषधे असोत किंवा अगदी जीवन विमा असोत, काँग्रेस सरकारने अशा विविध गोष्टींवर वेगवेगळे कर लादले होते."

"टूथपेस्ट, साबण, केसांच्या तेलावर २७ टक्के कर, अन्नाच्या प्लेट्स, कप, चमच्यांवर १८ ते २८% कर आणि टूथ पावडरवर १७ टक्के कर आकारायचे. इतकेच नव्हे तर काँग्रेसचे लोक मुलांच्या टॉफीवरही २१ टक्के कर घेत असत", असे पंतप्रधान पुढे म्हणाले. "देशातील कोट्यवधी लोकांची प्राथमिक गरज असलेल्या साध्या सायकलवर ते १७ टक्के कर आकारत असत. याचबरोबर लाखो माता आणि बहिणींसाठी स्वाभिमान आणि स्वयंरोजगाराचे साधन असलेल्या शिलाई मशीनवरही काँग्रेसने १६ टक्के कर लादला होता", असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे. काँग्रेसवर घाणाघात करत पंतप्रधान यावेळी म्हणाले की, "काँग्रेसने सर्वसामान्यांसाठी घरे बांधणे देखील कठीण केले होते. कारण ते सिमेंटवर २९ टक्के कर आकारत होते. याचबरोबर मध्यमवर्गीयांसाठी प्रवास आणि पर्यटनही खूप कठीण बनवले होते. ते हॉटेलच्या खोल्यांवर १४ टक्के आकारायचे. त्यांनी एअर कंडिशनर, टेलिव्हिजन आणि, पंखे यासारख्या वस्तूंवरही ३१ टक्के कर लादला होता." जीएसटी कौन्सिलने काल जाहीर केलेल्या जीएसटी सुसूत्रीकरणाच्या माध्यामातून जीएसटी दराचे दोन टप्पे वगळून ते ५ टक्के आणि १८ टक्के असे करण्यात आले आहेत. यामुळे अन्न, औषधे, जीवनावश्यक वस्तू, शेतीच्या वस्तू, हरित ऊर्जा, लहान कार आणि सायकली यासह अनेक वस्तूंवरील कर कमी होणार आहेत.




## प्रसिद्ध 'खारघरचा राजा' गणेशमंडपात पं. उमेश चौधरी यांची बाप्पाच्या चरणी स्वर सुमनांजली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात खारघरमधील प्रसिद्ध 'खारघरचा राजा' या गणेशमंडपात भक्तिभावाचे वातावरण दाटून आले होते. यंदा विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे पं. उमेश चौधरी यांचे सुमधुर गायन. त्यांनी विविध भक्तिगीत, अभंग आणि भजनी रचना सादर करून बाप्पाच्या चरणी स्वर सुमनांजली अर्पण केली. सुरेल आलाप, भावपूर्ण प्रस्तुती आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वरांमुळे उपस्थित भाविक तन्मयतेने ऐकत होते. पं. चौधरी यांच्या गाण्यांनी गणेशभक्तांच्या मनात भक्तिभाव अधिक वृद्धिंगत झाला. कार्यक्रमाच्या अखेरीस "गणपती बाप्पा मोरया"च्या घोषणांनी संपूर्ण मंडप दुमदुमून गेला. खारघरचा राजाचे संस्थापक व आयोजक विजय पाटील आणि वनिता पाटील आणि सहकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



पं. उमेश चौधरी यांनी सादरीकरणाची सुरुवात श्लोकाने केली. त्यानंतर त्यांनी "तू सुखकर्ता तू दुःखहर्ता", "रूप सावळे सुंदर", "सुखाचे हे सुख", "श्री रामचंद्र कृपाळू", "आधी मन घेई हाती", "कानडा राजा पंढरीचा", "रे मज भुलविले वेणू नाद", "स्वामी कृपा कधी करणार" अशी एकापाठोपाठ एक रचना सादर केली. अखेरीस गणपती गजर करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सादरीकरणात त्यांना पखवाजवर सुप्रसिद्ध पखवाज वादक मधुकर धोंगडे, तबल्यावर सुरज गोंधळी, हार्मोनियमवर मंदार दीक्षित, टाळवर अरुण भगत तर साक्षी घरत आणि अक्षय चौधरी यांची साथ संगत लाभली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोपान आढाव यांनी केले.






# ऑटो रिक्षा आणि चार चाकी कारचा अपघात

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: मुंबई गोवा महामार्ग कर्नाळा पक्षी अभयारण्य खिंडीमध्ये 3 सप्टेंबर रोजी सकाळी पावणे सातच्या दरम्यान उतारावर रिक्षा आणि चार चाकी कारचा अपघात झाला. या अपघातात रिक्षातील दोघेजण जखमी झाले. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात एरटिगा कार चालक विक्रम विठ्ठल तोरणे ( राहणार कोपरखैरणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

विजय महादेव कदम ( राहणार भांडुप पश्चिम) हे मुंबई गोवा महामार्गाने मुंबई लेनने भांडुप मुंबई येथे ऑटो रिक्षा क्रमांक एम एच ०३ बी वाय ८८५३ ने जात होते. कर्नाळा पक्ष अभयारण्य उतारा जवळ त्यांची रिक्षा आली असता त्यांचा नातू याला लघुशंकेसाठी रिक्षा थांबवत असताना अचानक पाठीमागून एर्टिगा टुरिस्ट कार क्रमांक एम एच 43 सी क्यू ०७४७ ने त्यांच्या रिक्षाला धडक दिली. या अपघातात रिक्षात असलेल्या त्यांचा मुलगा विवेक आणि पुतणी अपर्णा हे गंभीर जखमी झाले. आणि रिक्षाचे नुकसान झाले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.



# शालेय जीवनात शक्य होईल तितके मोबाईल पासून दूर राहा . कु.अर्चना सावदेकर

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (प्रतिनिधी) :- रणजित. ठाकूर**

शालेय जीवनात यश प्राप्त करायचे झाल्यास विद्यार्थ्यांनी शक्य होईल तितके मोबाईल पासून दूर राहावे असे स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे लेखा परीक्षणासाठी आल्या असता विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना लेखाधिकारी जिल्हा परिषद वाशिम अर्चना सावदेकर यांनी असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

यावेळी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने उपप्राचार्य संजय नरवाडे, पर्यवेक्षक गजानन भिसडे, शिक्षक प्रतिनिधी खुशाल राठोड, ज्येष्ठ महिला शिक्षिका कविता चव्हाण व अर्चना देशमुख यांनी अर्चना



सावदेकर मॅडम यांचे शाल व बुके देऊन स्वागत केले. पुढे बोलताना सावदेकर मॅडम विद्यार्थ्यांना म्हणाल्या की, आज तुमच्याशी हितगुज साधताना मला माझे शालेय जीवन आठवले,आमच्या शालेय जीवनात मोबाईल नव्हता आणि म्हणूनच कदाचित आम्ही आज जीवनामध्ये ज्या पदावर पोहोचलो त्या पदापर्यंत पोहोचू शकलो. तुम्हालाही जर जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर तुम्हीही मोबाईल पासून दूर राहिले पाहिजे, मोबाईलचा अतिवापर ही आजच्या पिढीला लागलेली एक वाईट सवय आहे. त्यांनी यावेळी शाळेतील उपस्थित विद्यार्थ्यांच्या संख्ये बद्दल शाळेचे कौतुक केले व विद्यार्थ्यांनीही नियमित शाळेत यावे असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. यावेळी उपप्राचार्य संजय नरवाडे यांनीही आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी गणेशराव देशमुख,धनंजय पवार, संदीप जटाळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा.विजय देशमुख यांनी केले.

# मोटारसायकल चोरट्यांकडून 2 मोटारसायकल किंमत 90 हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी / वाशिम गजानन पवार पाटील**

पोलीस स्टेशन अनसिंग हद्दीत वाढत असलेल्या मोटरसायकल चोरीच्या घटना आळा घालण्याकरिता माननीय पोलीस निरीक्षक अमर चोरे यांनी पथक नेमून पोलीस स्टेशन येथील

अनसिंग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमर चौरे अक्शन मोडवर तसेच अनसिंग पोलीस स्टेशनचे डीबी पथक अक्शन मोडवर.

अपराध नंबर 65/25 व 70/25 कलम 303(3) भारतीय न्याय संहिता 2023 ते गुन्ह्यातील दोन मोटरसायकल ह्या आरोपी नामे ज्ञानेश्वर किसन चव्हाण व 26 वर्ष राहणार अश्विनी पुर तालुका पुसद जिल्हा यवतमाळ गल्ली मुक्काम कात्रज पुणे यांचे कडून जप्त करण्यात आली आहे सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक अनुज तारे, अप्पर पोलीस अधीक्षक मा लता फड उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल शिरसागर



यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमर चोरे, पोलीस हवालदार उमेश इंगोले अशोक मस्के पथकातील अंमलदार नरेश घुगे,किशोर सूर्यवंशी, दादाराव भोयर, अरविंद साबळे यांनी केली आहे. गुन्ह्यातील फिर्यादी यांनी अनसिंग पोलीस स्टेशनचे कौतुक व आभार केले आहे.

# धनाजी सिताराम जाधव, आरोग्य सहाय्यक निवृत्त

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

आरोग्य सहाय्यक धनाजी सिताराम जाधव प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून सेवानिवृत्ती समारंभ देण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी काशिनाथ पाटील माजी सभापती, पंचायत समिती पनवेल, मदन मते, सरपंच कानपोली राजेश गोंधळी, सरचिटणीस शे.का.प, डॉ.अपर्णा खेडेकर, तालुका आरोग्य अधिकारी, पनवेल डॉ.प्रभाकर पाटील, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, वावंजे, डॉ. विजया पवार ,वैद्यकीय अधिकारी प्राथमिक



आरोग्य केंद्र वावंजे आरोग्य कर्मचारी तसेच आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सणसर शाखेत जिल्हा बँकेचा वर्धापन दिन जोरदार साजरा



**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

देशातील अग्रगण्य म्हणून परिचित असणारी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा 108 वा वर्धापनदिन गुरुवार दि.4 सप्टेंबर रोजी सणसर शाखेत माजी विभागीय अधिकारी म्हणून काम केलेले तानाजीराव जाधव सणसर येथील जेष्ठ नागरिक विलास माने गुरुजी इंदापूर तालुका बँक अधिकारी आनंद थोरात साहेब यांच्या हस्ते केक कापून उत्साहात साजरा करण्यात आला.सणसर शाखेतील शेतकरी सभासद खातेदार ठेवीदार कर्जदार आणि हितचिंतक यांना बँकेच्या वतीने पेढा व चिवडा वाटप करण्यात आला.

यावेळी पुणे जिल्हा बँकेचे अधिकारी शाखाप्रमुख बळीराम शिंदे विकास अधिकारी प्रशांत पोरे प्रवीण मासाळ सचिन खरात प्रमोद मोरे गणेश कोयले उपस्थित होते.

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची आढावा बैठक..!

## आ.निलंगेकर यांचे अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर**
**शिरुरआनंतपाळ :**

तालुक्यात दिं. २७ व २८ ऑगष्ट रोजी झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आज शिरूर अनंतपाळ तहसिल कार्यालय येथे तालुक्यातील सरपंच उपसरपंच पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील अधिकारी यांच्या समेवत माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेत, मतदारसंघात सुरु असलेल्या विविध विकास कामांची माहिती




जाणुन घेतली. अतिवृष्टीमुळे नागरिक व शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पशुधनाची हानी आणि पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी वर्ग खचला आहे. त्यामुळे त्यांना आधार देणे हे प्रशासनाचे सर्वांत मोठे दायित्व आहे. सर्वांनी नुकसानाचे तत्काळ पंचनामे करून बाधितांना पूर्ण न्याय व मदत मिळावी, यासाठी प्रयत्न करावेत. तसेच सर्व विकासकामे लवकरात लवकर पूर्ण करून ती नागरिकांच्या सेवेत सुरू करावीत, असे निर्देश देण्यात आले. यावेळी तहसीलदार किशोर यादव, नायब तहसीलदार महसूल विभाग लाला कांबळे, गटविकास अधिकारी शितलताई खिंडे, पोलिस निरीक्षक अनंत भंडे, जिल्हा सरचिटणीस संजयजी दोरवे, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, निलंगा विधानसभा प्रभारी दगडु सोळंके, तालुकाध्यक्ष माधव बिरादार आदींसह तालुक्यातील नागरिक व प्रशासनाती वरिष्ट अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# पैशाचा खेळ : माणसाची किंमत की पैशाची ताकद?”

लेखक – आसाराम विरकर
(संपादक, दैनिक युवक आधार)

आजच्या काळात समाजात एक मोठा बदल दिसून येतो. पूर्वी माणसाची किंमत त्याच्या चारित्र्यावर, विचारांवर, कष्टावर आणि ज्ञानावर ठरवली जायची. पण आता परिस्थिती उलटी झाली आहे. माणसाची किंमत त्याच्याकडे किती पैसा आहे यावर ठरवली जाते. ज्याच्याकडे पैसा नाही त्याला कोणीच किंमत देत नाही आणि ज्याच्याकडे पैसा आहे तो मात्र कुणालाच किंमत देत नाही.

गरीब माणूस कितीही हुशार, परिश्रमी आणि प्रामाणिक असला तरी त्याच्या खिशात पैसा नसेल तर त्याला समाजात मान–सन्मान मिळत नाही. त्याच्या विचारांना महत्त्व दिलं जात नाही. नातेवाईक, मित्र आणि समाज याच्याकडे तुच्छतेने पाहतो. त्याची स्वप्नं अपुरी राहतात, शिक्षण अर्धवट थांबतं आणि आयुष्य उपेक्षेत जातं. अशा परिस्थितीत माणूस जगतो पण सतत अपमान सहन करत जगतो.

याउलट, ज्याच्याकडे पैसा आहे त्याचं चित्र वेगळं असतं. त्याला समाजात




सगळं काही सहज मिळतं. मान, प्रतिष्ठा, सत्ता, ओळख, सगळं पैशामुळे मिळतं. लोक त्याच्या चुकांना देखील दुर्लक्ष करतात. पैसा आल्यावर माणसाचं वागणं बदलतं. तो इतरांकडे खाली पाहतो, नातीगोती विसरतो आणि सगळं काही पैशाने विकत घेता येतं अशा चुकीच्या समजुतीत जगतो.

हे वास्तव नाकारता येणार नाही की पैशाशिवाय जीवन जगणं अवघड आहे. पण हेही तेवढंच खरं आहे की पैशाने सर्व काही विकत घेता येत नाही. पैसा सुखसोयी देतो, पण खरी माणुसकी, आत्मसन्मान, प्रेम, आदर आणि समाधान पैशात मिळत नाही. जगातील कित्येक श्रीमंत लोक एकाकीपणाने त्रस्त असतात, तर गरीब माणूस थोड्याशा गोष्टींमध्येही आनंद शोधतो.

समाजात पैशाच्या आधारावर माणसाची किंमत ठरवण्याची प्रवृत्ती वाढली आहे, ही धोकादायक गोष्ट आहे. यातून श्रीमंत–गरीब दरी वाढते, अन्याय आणि विषमता वाढते. गरीब अधिक गरीब होतो, श्रीमंत अधिक श्रीमंत होतो. पैशाविना जगणाऱ्यांच्या समस्या कोणी गंभीरतेने घेत नाही आणि पैसा असलेले लोक समाजाचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी करतात.

माणसाने पैसा कमावणं चुकीचं नाही. पण पैसा मिळाल्यानंतर त्याचा वापर स्वतःपुरता करून समाज विसरणं ही मोठी चूक आहे. गरीबाने खचून न जाता मेहनत, प्रामाणिकपणा आणि ज्ञान यांचा आधार घेऊन स्वतःची ओळख निर्माण करावी. श्रीमंताने पैशाचा उपयोग समाजातील दुर्बल घटकांना उभं करण्यासाठी केला पाहिजे.


शेवटी, पैसा हे साधन आहे, साध्य नाही. पैशाच्या आधारावर माणसाची खरी किंमत कधीही ठरत नाही. माणसाच्या विचारांनी, स्वभावाने आणि चारित्र्यानेच त्याची खरी किंमत ठरते. पैशाचा खेळ नक्कीच मोठा आहे, पण त्याहून मोठं आहे माणुसकीचं जिंकणं.

# महाराष्ट्र पोलिसांचे विशेष धन्यवाद

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

बोरी:मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते सौरभ कुकडे यांनी महाराष्ट्र पोलिसांचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, "गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान पोलिसांनी दाखवलेली सतर्कता आणि शिस्त कौतुकास्पद आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासनाने अतिशय जबाबदारीने काम केले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हा सोहळा शांततेत यशस्वीरीत्या संपन्न झाला.गावात डझनभर पोलीस अधिकारी, कर्मचारी व गृह रक्षक दल तैनात होते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली विसर्जन मिरवणुकीवर लक्ष ठेवण्यात आले. या सर्व व्यवस्थेमुळे गावकरी निश्चिंतपणे उत्सव साजरा करू शकले.

सामाजिक कार्यकर्ते सौरभ कुकडे यांनी महाराष्ट्र पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांच्या सेवेचे विशेष कौतुक केले. तसेच भविष्यातील सर्व सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांत नागरिकांनी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही केले.




दैनिक युवक आधार

हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR

Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## सिद्धार्थ नगरमधील धोंड गल्लीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था; पालिकेचे सातत्याने दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

**श्रीवर्धन, ता. ४ सप्टेंबर** – श्रीवर्धन शहरातील सिद्धार्थ नगर परिसरामधील महामानव, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळील धोंड गल्लीकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, स्थानिक नागरिक वेळोवेळी श्रीवर्धन नगरपरिषदेकडे पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, सदर रस्ता हा दररोज नागरिकांच्या वापरातील असूनही, खड्डे, साचलेले पाणी आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट होते. याठिकाणी लहान मुले, वृद्ध यांची दररोज वर्दळ चालू असते, स्थानिक नागरिकांनी सांगितले की, "आम्ही वारंवार तक्रारी करूनही नगरपरिषद केवळ आश्वासन देत आहे. प्रत्यक्षात काहीच काम होत नाही. आंबेडकर स्मारकासारख्या महत्त्वाच्या स्थळी जाणारा रस्ता जर असा असावा, तर इतर भागांची काय अवस्था असेल याची कल्पनाही करता येत नाही, स्मारक परिसर हा सामाजिक, सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा असून, अनेक नागरिक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते येथे नियमितपणे भेट देत असतात. अशा ठिकाणी जाणारा रस्ता जर दुरुस्त नसेल, तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतो, नगरपरिषदेच्या दुर्लक्षित धोरणामुळे परिसरातील नागरी सुविधा वारंवार मागे पडत आहेत. नागरिकांनी लवकरात लवकर या समस्येकडे लक्ष देऊन करून योग्य ते काम करण्यात यावे, अशी मागणी केली आहे



# देगलूर येथे मेजर माधव खंडागळे यांचा सत्कार

दैनिक युवक आधार
.तालूका प्रतिनिधीः महादेव उप्पे

देगलूर(दि.०५)मुखेड तालुक्यातील मौ.जाहूरचे येथील सुपुत्र मेजर माधव गोविंदराव खंडागळे यांनी भारतीय सैन्यदलात १६ वर्ष कार्य करून देशसेवेसाठी कामगिरी बजावली.या प्रदीर्घ सेवेनंतर ते सेवानिवृत्त झाल्याने देगलूर शहरात ढोलताशांसह मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले. शहरातील भक्तापूर रोडवरील त्यांच्या निवासस्थानापासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकापर्यंत काढण्यात आलेल्या मिरवणुकीत नागरिकांनी राष्ट्रभक्तीचे घोषवाक्य देत छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यानंतर रामपूर रोडवरील राजशेखर मंगल कार्यालयात सेवा पूर्ती सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी देगलूर तालुक्यातील आजी-माजी सैनिकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास देगलूरचे पोलीस निरीक्षक मारोती मुंडे,संस्कृती इंग्लिश डिजिटल स्कूलचे संचालक शंकरराव बोडके,नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर डुमणे,तालुकाध्यक्ष अनिल वट्टमवार,प्रभाकर बारमळे,रामलू कोयलकोंडवार,जयराम कडलवार, मारोती इंगोले,रमेश कांबळे,शेख शब्बीर,गंगाधर भरडे,गोविंद दामेकर,सुभाष सगर,शेख मोहम्मद अली,व्यंकट अनमुलवाड,नामदेव हिवराळे आदी माजी सैनिक,कृउबाचे माजी उपसभापती मोहित पाटील, कैलास येसगे,मोतीराम कावळगड्डे, शिवाजी केरूरे,अवधूत भारती यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.हवालदार खंडागळे यांनी नासिक येथे प्रशिक्षण घेतल्यानंतर




जम्मू-कश्मीर,डेहराडून,पंजाब, आसाम,शिलॉंग,राजस्थान अशा विविध सरहद्दी आणि संवेदनशील भागात सेवा बजावली.शेवटी पंजाब येथून ते सेवामुक्त झाले.राजशेखर मंगल कार्यालयात आयोजित भव्य सत्कार सोहळा प्रसंगी अनेक मान्यवरांनी विचार मांडताना खंडागळे यांच्या राष्ट्रसेवेचे सर्वानी कौतुक केले आहे

# सिद्धार्थ धंदरे यांची युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

चिखली (बुलढाणा) चिखली तालुक्यातील सर्वांच्या परिचयाचे असणारे दैनिक युवक आधारचे चिखली तालुका प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे यांची राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.या निवडीचे पत्र नुकतेच राष्ट्रीय युवा ग्रामीण संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सन्माननीय गणेशजी कचकलवार साहेबांनी दिले आहे. यावेळी राष्ट्रीय अध्यक्षांनी नूतन जिल्हाध्यक्षांचं अभिनंदन करून पुढील वाटचालीस खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या.गोरगरीब व शेतमजुरांच्या हक्कासाठी सदैव तत्पर राहून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघ कार्यरत असून त्यांनी आतापर्यंत अनेक शेतमजूर व गोरगरिबांना न्याय मिळवून दिला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेतमजूर व गोरगरीब यांना न्याय मिळवून देण्यासाठी बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी युवा पत्रकार



सिद्धार्थ धंदरे यांची नियुक्ती

करण्यात आली आहे.सिद्धार्थ धंदरे हे चिखली येथील रहिवासी असून त्यांनी विविध पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक गोरगरी व शेतमजुरांना न्याय मिळवून दिला असून सध्या ते दैनिक युवक आधारचे चिखली तालुका प्रतिनिधीचे काम पाहत आहेत.सामाजिक व राजकीय कार्यात त्यांचा सहभाग नेहमी असतो.सिद्धार्थ धंदरे यांची युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यामुळे सामाजिक व राजकीय तसेच पत्रकार क्षेत्रातील मंडळीने त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला आहे. नियुक्तीला उत्तर देताना युवा पत्रकार सिद्धार्थ धंदरे म्हणाले की,युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी जी माझ्यावर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी टाकली त्या माध्यमातून मी पत्रकार,विद्यार्थी,युवा बेरोजगार,सर्वसामान्य जनता, शेतमजूर व गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर राहील तसेच त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटच्या घटकापर्यंत प्रयत्न करणार असल्याचे सिद्धार्थ धंदरे यांनी सांगितले.सिद्धार्थ धंदरे यांनी आपल्या निवडीचे श्रेय युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार साहेबांचे आभार मानले,यावेळी नूतन बुलढाणा जिल्हा अध्यक्ष सिद्धार्थ धंदरे यांनी म्हटले आहे की जी जिम्मेदारी माझ्यावरती राष्ट्रीय अध्यक्षांनी टाकली आहे. ती मी पूर्णपणे सर्वांना न्याय देण्यासाठी पार पाडेल यात काहीच शंका नाही.

# कामोठे येथे हॅप्पी सिंग यांचा वाढदिवस ज्येष्ठांचा सन्मान करत भव्यदिव्य साजरा

### 1000,जेष्ठ नागरिकांचा सत्कार करत अभिष्टचिंतन सोहळा शानदार संपन्न

**दैनिक युवक आधार**

**कामोठे/आण्णासाहेब आहेर :** समाजकार्यात नेहमीच आघाडीवर असलेले,अल्पसंख्यांक आयोग सदस्य महाराष्ट्र राज्य मा.हॅप्पी सिंग यांनी आपला वाढदिवस यंदा आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करत समाजाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित केली. समाज मंदिर,सेक्टर ६,कामोठे येथे आयोजित बुधवार दिनांक ३,सप्टेंबर रोजी भव्य अभिष्टचिंतन सोहळा कार्यक्रमात तब्बल १००० जेष्ठ नागरिक यांना पॅन्ट शर्ट व उपस्थित महिलांना साडी भेट देऊन सन्मान करण्यात आला पनवेल चे आमदार प्रशांतदादा ठाकूर,युवा नेते प्रीतमदादा म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील माजी नगरसेवक कामोठे शहर मंडल अध्यक्ष विकास घरत, शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे यासह राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवर,कार्यकर्ते व जनतेच्या उपस्थितीत अभिष्टचिंतन सोहळा शानदार संपन्न झाला उपस्थित जेष्ठ नागरिकांसाठी पाच लकी ड्रॉ चे कुपन मधून एल ई डी टीव्ही,एक्वागार्ड,स्पोर्ट शूज,स्मार्ट मोबाइल



देऊन विजेत्या ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला, ह.भ.प कैलास महाराज निचिते (वारकरी तत्त्वज्ञान विद्यापीठ,शहापूर) यांची कीर्तन सेवा संपन्न झाली या सोहळ्यात बोलताना हॅप्पी सिंग म्हणाले, “जेष्ठांचा आशीर्वाद हेच माझे खरे बळ आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून व अनुभवातून प्रेरणा घेऊन समाजहिताच्या कार्यासाठी पुढेही वेगवेगळ्या प्रकारचा संकल्पना राबवण्याचा मानस त्यांनी वाढदिवशी व्यक्त केला,वाढदिवस हा केवळ स्वतःपुरता न राहता समाजोपयोगी ठरावा यासाठीच हा उपक्रम हॅप्पी सिंग यांनी राबवला .” कामोठे व परिसरातील लोकांसाठी झोकून देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे हॅप्पी सिंग असे आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी मनोगत व्यक्त करताना मत व्यक्त केले, तसेच सत्तेतील किंवा विरोधातील भेटणं राजकारणाच्या पलीकडचे व्यक्तिमत्व हॅपी सिंग हे असल्याचे पनवेल महापालिका विरुद्ध पक्ष नेते प्रीतमदादा म्हात्रे यांनी मनोगतातून आपले मत मत व्यक्त केले,संपूर्ण कार्यक्रमात वातावरण उत्साहवर्धक राहिले. जेष्ठ नागरिकांनीही व उपस्थित जनतेने या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत हॅप्पी सिंग यांना आशीर्वाद दिले.

# मराठा समाज आरक्षणाच्या विजयाचा आनंद उत्सव पारोडीत जल्लोषात साजरा

**दैनिक युवक आधार**
**अंभोरा (प्रतिनिधी):**

मराठा समाजासाठी आरक्षण मिळवून देण्यासाठी संघर्ष करणारे मराठा क्रांतीचे योद्धे श्री. मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याबद्दल पारोडी ग्रामस्थांच्या वतीने प्रभात फेरी व दिंडी काढून आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारोडी येथून सुरुवात करून म्हसोबा मंदिरापर्यंत दिंडीचे आयोजन करण्यात आले. “ज्ञानोबा-तुकाराम” यांच्या गजरात दिंडीमधून मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला व विद्यार्थी सहभागी झाले होते.या उत्सवात ग्रामस्थांच्या सेवाभावाने विशेष लक्ष वेधले. श्री. तात्यासाहेब सायबर, श्री. सुर्यभान आबा सायबर, श्री. पंढरीनाथ सायबर व श्री. म्हसू सायबर यांनी सर्व ग्रामस्थ व विद्यार्थ्यांसाठी चहापाणी व्यवस्था केली. श्री. दत्तू भिकू सायबर यांनी नाश्ता व जेवणाची सोय केली, तर श्री. बापू भिवा सायबर यांनी मुलांना समोश्यांचा नाश्ता दिला. यावेळी श्री. बंकट तात्या परकाळे, श्री. नामदेव सायबर, श्री. प्रकाश परकाळे, श्री. भैरवनाथ सायबर, श्री. जालिंदर सायबर, श्री. आदिनाथ महाराज सायबर, श्री. दादासाहेब परकाळे, श्री. दत्तू काळे, श्री. बाळासाहेब सायबर, श्री. मच्छिंद्र खताळ, श्री. घोडके, श्री. काळे, श्री. गलांडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक शिंदे सर, डहाळे सर, श्रीमती आरती सायबर मॅडम यांच्यासह महिला मंडळी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. शेवटी सर्वांनी संघर्ष योद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानून आरक्षणाच्या विजयाचा उत्सव आनंदाने साजरा केला.





# प्रदीप पाटील कुटे यांची शिवसेना (शिंदे गट) मालेगाव तालुका प्रमुख पदी निवड....

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**मालेगाव (वाशिम)** प्रदीप पाटील कुटे यांची शिवसेना शिंदे गटाच्या मालेगाव तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे. सन्माननीय अपराजित खासदार तथा आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी नुकतीच प्रदीप पाटील कुटे यांची मालेगाव तालुका प्रमुख पदी निवड केली आहे,शिवसेना पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या निर्देशानुसार शिवसेना नेत्या आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी मालेगाव तालुक्यात व शहरात शिवसेनेची पकड मजबूत करण्याच्या दृष्टीने तसेच आगामी स्थानिक स्वराज्य निवडणूक सर्वांना सोबत घेऊन



चालणारे प्रदीप पाटील कुटे यांची शिवसेना मालेगाव तालुका प्रमुख पदी निवड केली आहे. आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती नगरपंचायत,नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रदीप पाटील कुटे यांची शिवसेना तालुका प्रमुख पदी निवड केल्याने मालेगाव तालुक्यासाठी शिवसेना शिंदे गट या पक्षासाठी नवसंजीवनी मिळणार आहे,शिवसेना नेत्या आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी शिवसेना पक्षाच्या

प्रदीप पाटील कुटे यांच्या विषयी सांगायचं झालं तर डोक्यावर बर्फ,तोंडात साखर,पायाला भवरा या म्हणीप्रमाणे प्रदीप पाटील कुटे वागत असतात.त्यांचाच एक भाग म्हणून आदरणीय शिवसेनेच्या नेत्या तथा आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी मालेगाव तालुक्याची धुरा प्रदीप पाटील कुटे यांच्यावर सोपवली आहे. निश्चितच प्रदीप पाटील कुटे हे आपल्या पदाला शोभेल असे काम करून दाखवतील यात काहीच शंकाच नाही...

मालेगाव तालुका प्रमुख पदी नियुक्ती करून प्रदीप पाटील कुटे यांची पदोन्नती केली आहे,यापुर्वी प्रदीप पाटील कुटे हे पक्षाचे रिसोड मालेगाव विधानसभा संपूर्ण प्रमुख होते,आता तालुक्यातील जिल्हा परिषद,पंचायत समिती, नगर पंचायत,ग्राम पंचायतीच्या निवडणुकीच्या दृष्टीने प्रदीप पाटील कुटे त्यांच्यावर मोठी जिम्मेदारी सोपवली आहे,प्रदीप पाटील कुटे यांच्या मालेगाव शिवसेना तालुका प्रमुख नियुक्ती प्रसंगी दबंग शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे, जिल्हाप्रमुख विजय खानझोडे, महिला जिल्हाप्रमुख वैशालीताई येळणे,युवा सेना जिल्हाप्रमुख रवीभाऊ भांदुर्गे,युवा सेना जिल्हाप्रमुख प्रदीप पाटील मोरे व,ओबीसी सेल जिल्हाप्रमुख विजय बोरकर,जिल्हा समन्वयक अनिल गरकळ,उपजिल्हाप्रमुख मंगेश महाराज घुगे,राजू पाटील कव्हर,माणिकराव गालट,रिसोड तालुका प्रमुख मच्छिंद्र पाटील ढोणे,यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

## सराटेवडगाव-आनंदवाडी सरपंच कोमलताई भिमराव बोडखे यांचा बीड जिल्हा परिषद च्या वतीने सन्मान

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

ग्रामपंचायत व (CSR फंडातून) आयसी आयसी आय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गावांतर्गत राबवलेले उपक्रम नदी खोलीकरण,गांडूळ खत प्रकल्प,प्रत्येक कुटंबाला स्मार्ट चुल्हा,3 ऐकर क्षेत्रावर मियावकी (घनवन) प्रकल्प,ग्रामपंचायत साठी कचरा व्यवस्थापन करण्यासाठी घंटागाडी,गाव कार्बनमुक्त तसेच हरित गाव करण्याच्या दिशेने होणारी वाटचाल त्यासाठी राबवलेले उपक्रम त्याचप्रमाणे पाणी फाउंडेशन व वॉटर ऑरगनझेशन ट्रस्ट या संस्थेमार्फत ही गावात अनेक विकासकामे ग्रामपंचायत अंतर्गत सुरू आहेत याची दखल घेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळेत बीड जिल्हा परिषद च्या वतीने सरपंच कोमलताई भिमराव बोडखे यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी मुख्य अतिथी जितिन रहेमान(मुख्य कार्यकारी अधिकारी,बीड)श्री.जाधव(अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,बीड),संगीता देवी पाटील(प्रकल्पसंचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,बीड),श्री.किशोर काळे (उपमुख्य कार्यकारी अधिकारी,बीड)आष्टी पंचायत समितीचे BDO गोकुळ बागलाने,अंबाजोगाई च्या BDO




समृद्धी दिवाने,परळी चे BDO संजय केंद्रे,वडवणी चे BDO विठ्ठल नागरगोजे,इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# गौरी-गणपती विसर्जनानंतर कोकणवासीयांचा परतीचा प्रवास कष्टदायक

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

**गणेशोत्सवाच्या उत्साहात गणराया** ला निरोप दिल्यानंतर कोकणवासीय परतीच्या प्रवासाला लागले, मात्र या प्रवासात त्यांना झालेला त्रास सोसावत नाही. बुधवारी (ता.३) सकाळपासून रायगड जिल्ह्यातील सर्व एसटी आगारांमध्ये ठासून गर्दी झाली. प्रशासनाने अतिरिक्त गाड्या सोडल्या असल्या तरी प्रवाशांचा प्रचंड ओघ पाहता तीही अपुरी ठरली.अलिबाग आगारात सकाळी पाऊल टाकताच गोंधळलेले दृश्य पाहायला मिळाले. कुणी खांद्यावर बॅगा लटकावून तिकीट खिडकीत रांगेत उभा, कुणी लेकरांना हातात धरून गाडीची वाट पाहत तर कुणी गाडीत चढण्यासाठी झगडताना दिसत होते.



“बस मध्ये बसायला जागा नाही, उभं राहायलाही जागा नाही. मुंबईला परतायचं कसं?” – सुनिता कदम, प्रवासी".

गाव सोडताना मन भरून आलं, पण परतताना मुलांना एवढ्या गर्दीत घेऊन प्रवास करणं म्हणजे शिक्षा आहे.” – **रविंद्र पाटील, प्रवासी**

मांडवा ते गेटवे आणि रेवस–भाऊचा धक्का जलवाहतूक बंद असल्याने सर्व प्रवाशांचा ओघ एसटीकडेच वळला. परिणामी एका गाडीच्या निघण्याच्या वेळी शेकडो लोक आत घुसण्याचा प्रयत्न करू लागले. “तिकीट मिळालंय, पण गाडीत जागा मिळत नाही. प्रशासन सांगतं व्यवस्था केलीय, पण आम्हीच बघतोय ना काय स्थिती आहे,” अशी संतप्त प्रतिक्रिया नागेश शेट्टी यांनी दिली.रस्त्यांवरही परिस्थिती वेगळी नव्हती. मुरुड–रेवदंडा–अलिबाग– वडखळ मार्गावर लांबच लांब गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. खासगी वाहनांमध्ये प्रवास करणाऱ्यांनाही दुप्पट वेळ लागत होता.एसटी प्रशासनाने ३ सप्टेंबरला तब्बल ५२५, तर ४ सप्टेंबरला १२५ अतिरिक्त गाड्या सोडल्या. तरीदेखील अनेकांना तासन्तास थांबूनही बस मिळाली नाही. “जाहिरातींमध्ये सोयीसुविधा दाखवतात, पण प्रत्यक्षात प्रवासी रस्त्यावरच अडकतात. एवढ्या लोकांसाठी अजून गाड्या सोडल्या पाहिजेत,” अशी टीका प्रवाशांनी केली.यंदा गणेशोत्सवासाठी पाच हजारांहून अधिक बस सोडल्याचा दावा एसटीचा आहे. मात्र विसर्जनानंतर नागरिकांनी परतीच्या प्रवासात अनुभवलेली गर्दी, गोंधळ आणि गैरसोयी पाहता प्रशासनाची तयारी कितपत वास्तव होती, यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या

## दत्तू पाटील अंभोरे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**वरूड सर्कल प्रतिनिधी ज्ञानेश्वर निकाळजे**

जाफ्राबाद तालुक्यातील गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून तोंडाशी आलेले पिक सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, मिरची,यासारखी पिके बहुतांश पाण्याखाली गेल्याने शेतकरी अक्षरांश हतबल झाला आहे गावकरी विकास समितीच्या नोंदीप्रमाणे २ सप्टेंबर रोजी तालुक्यात सरासरी ६५ मि मि पेक्षा जास्त पाऊस झाला त्याचा फटका थेट शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पिकांना बसला नद्यांना आलेल्या पुरामुळे नदीकाठावरील शेत पिके व माल मोठ्या प्रमाणावर वाहून गेले त्यामुळे शेतकऱ्यांवर अधिक संकट ओढावले आहे सन २०२५ते २०२६ या हंगामात आधीच कर्जाच्या बोजाणे त्रस्त असलेल्या बळीराजा अवकाळी पावसामुळे उध्वस्त झाला आहे पिकांना फळधारणा झाली नसल्यामुळे उत्पन्न घटणार असून शेतीच्या कार्यक्षमता कमी झाली आहे या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष दत्तू पाटील अंभोरे आणि साहेब, कृषी कार्यालय जाफ्राबाद चे,मंडळ कृषी अधिकारी शेळके साहेब, पंचायत समिती कार्यालय जाफ्राबाद, चे गटविकास अधिकारी , नारायण या मागणीसाठी विनोद डिगे, माणिकराव वायाळ, चांगणाबाई वायाळ, अशोक म्हस्के, बाळू भाऊ हिवाळे, ज्ञानेश्वर गाडे,गजानन वायर,













कार्यकर्त्यांनी शासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली आणि निवेदन देण्यात आले आहे
यावेळी तहसील कार्यालय जाफ्राबाद चे नायब तहसीलदार बी एस परके खिल्लारे साहेब , आदी कार्यालयात निवेदन देण्यात आले असून पंचनामा न करता सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा , सचिन सोरमारे,बालाजी गाडेकर,शेख मोसिन,नितीन पानपाटील, शेख फारुक यांच्या सह आदी शेतकरी व कार्यकर्त्यांनी पाठिंबा दर्शविला आहे

# सामान्य लोकांना प्राधान्य देणाऱ्या सुविधांची पॉलीकॅब व्यवस्था

## मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी गणेशोत्सवात पॉलीकॅबने मजबूत बंध निर्माण केले

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

**मुंबई,** ४ सप्टेंबर २०२५ : गणेशोत्सवाच्या काळात मुंबई भक्ती आणि उत्सवाच्या वातावरणाने भारलेली असतानाच, पॉलीकॅबने आपल्या ग्राहक केंद्रित दृष्टिकोनाची प्रचिती दिली. शहरातील दोन सर्वात प्रतिष्ठित आणि महत्त्वाची उत्सव स्थळे - लालबागचा राजा आणि जुहू बीच येथे भाविकांची सोय लक्षात घेत योग्य व्यवस्था करत मजबूत बंध निर्माण केले आहेत. भाविकांच्या गरजा ओळखून पॉलीकॅबने आराम, सुरक्षा आणि सुलभतेला प्राधान्य देणाऱ्या कार्यात्मक, भाविकांच्या सोयीसाठी जागा तयार करून त्यांचे स्थान अधिक भक्कम केले आहे. मुंबईतील भाविकांच्या गर्दीच्या गरजा ओळखून त्यांनी आपले उपक्रम तयार केले आहेत. या माध्यमातून पॉलीकॅब सामाजिक भान जपत आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या गोष्टींमध्ये आपले स्थान भक्कम करते आहे. लालबागचा राजा येथे दर्शन प्रवास अधिक सुरळीत आणि आरामदायी करण्यासाठी, पॉलीकॅबने दर्शन मार्गावरील स्थानिक बस




स्टॉपचे रूपांतर 'कम्फर्ट झोन' मध्ये केले आहे. यामुळे दर्शन रांगेतील भाविकांना जरा विसावा घेता येईल. त्यांचे मोबाइल रिचार्ज करण्यासोबतच ऊन तसेच पावसापासून बचावासाठी हा बस स्टॉपचा उपयोग करता येईल. याशिवाय भाविक तसेच स्वयंसेवकांची कनेक्टिव्हिटी राहावी म्हणून पॉलीकॅबने पंडालमध्ये मोबाइल चार्जिंग स्टेशन, सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या पोलिसांसाठी कम्फर्ट झोन, तसेच हवा खेळती राहणारे पॉलीकॅब पंख्यांनी सुसज्ज अशा वॉकवे झोनची व्यवस्था केली आहे. श्वेताल बसू, वरिष्ठ उपाध्यक्ष, ब्रँड आणि मार्कॉम, पॉलीकॅब इंडिया लिमिटेड म्हणाल्या,“गणेश चतुर्थी हा एकता आणि भक्तीचा उत्सव आहे. या व्यवस्थेद्वारे आम्ही समाजाला आराम देण्याचे उद्दिष्ट ठेवतो. केवळ उत्पादनांच्या पलीकडे जाऊन अर्थपूर्ण, ग्राहक प्रथम कनेक्शन तयार करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत." प्रमुख विसर्जन स्थळ असलेल्या जुहू बीचवर विसर्जनादरम्यान गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी पॉलीकॅबने ब्रँडेड सेफ्टी वॉच टॉवर्स बसवले आहेत. यामुळे अधिकाऱ्यांना देखील गर्दीवर नियंत्रण ठेवणे सोपे जाईल. अशा प्रयत्नांमुळे लाखो भाविकांशी असलेले पॉलीकॅबचे नाते अधिक दृढ होते आहे. पॉलीकॅबच्या भारतातील यशस्वी सांस्कृतिक कार्यक्रमांवर हा उपक्रम आधारलेला आहे. पुरीमधील रथयात्रेपासून मुंबईतील गणेश चतुर्थीपर्यंत पॉलीकॅब स्थानिक परंपरांशी जुळवून घेताना आराम, काळजी आणि मजबूत बंधाद्वारे लोकांना प्राधान्य देत उत्सवाचा आनंद द्विगुणित करत आहे.


# पालोदमध्ये मोकाट कुत्रे घालताहेत धुमाकूळ

## नागरिकांमध्ये दहशत, ग्रामपंचायतीकडे श्वानांच्या बंदोबस्ताची मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथे मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून टोळके गावातील गल्ली बोळातून रस्त्यावर येऊन धुमाकूळ घालत आहेत.त्यामुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे.ग्रामपंचायत प्रशासनाने तत्काळ या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी गावातील नागरिकांकडून केली जात आहे. या मोकाट कुत्र्यांचा ग्रामपंचायत व बाजारपट्टी परिसरात अधिक वावर आहे. गावातील गल्ली बोळांमध्ये कुत्र्यांचे टोळके फिरत आहेत. या मोकाट कुत्र्यांमुळे पालोद बसस्थानक ते शाळा व गावात येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.यातील अनेक कुत्र्यांना त्वचारोग झाला आहे.अनेकदा हे कुत्रे लहान मुले, शाळेतील विद्यार्थी यांच्यावर हल्ला करतात.त्यामुळे विद्यार्थी ,महिला, वयोवृद्धांना,धोका निर्माण झाला आहे. ही कुत्री जनावरांना पण चावत आहे. अनेकदा या मोकाट कुत्र्यांचे टोळके महामार्गावर जाते त्यामुळे दुचाकीधारक कुत्र्यांना वाचविण्याच्या प्रयत्नात लहान मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.महाविद्यालय व शालेय परिसरातही मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला असून विद्यार्थ्यांनाही धोका निर्माण झाला आहे.





मोकाट कुत्र्यांच्या टोळ्या फिरत असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. कुत्री रस्त्यावरून चालणार्या लोकांचा पाठलाग करुन चावा घेण्याचा प्रयत्न करतात.तसेच पाळीव प्राण्यांची शिकार करतात.ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त **करण्यासाठी मोहीम राबवावी.**
**- प्रभाकर माधवराव कुलकर्णी**
**ज्येष्ठ नागरिक**

# जाहीर प्रगटन

सर्वत्र जनता ग्रामपंचायत कार्यालय शाख १४ ता. जाफ्राबाद जि. जालना यांना या जाहीर प्रगटनाव्दारे जाहीर करण्यात येतो की, अर्जदार स्वतः नागे श्री/श्रीमती/कुमार/कुमारीः– पंडित जनार्धन दामधर रा.भारज बु ता. जाफ्राबाद यांचा / हिचा जन्म / मृत्यू दि. १५/०७/१९८० रोजी मौजे, भारज व ता.जाफ्राबाद येथे झालेला / झालेली आहे. तसेच वरील येथील रहीवाशी असून याचे जन्म/मृत्यूची ग्रामपंचागत कार्यालय, भारत भयेथे नोंद केलीली नसल्यामुळे अर्जदार यांनी या कार्यालयात जन्म–मृत्यू नोंद घेणे बाबत विनंती अर्ज सादर केले आहे. सदरील जन्म/मृत्यू नोंदी बाबत कोणास काही आक्षेप असल्यास हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाने आत लेखी स्वरुपात या कार्यालयास दाखल करावेत. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही. असे गृहीत धरून प्रकरणांत पूढील कार्यवाही येईल यांची नोंद घ्यावी.
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार जाफ्राबाद.
प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
**१. पोलीस निरीक्षक /** सहा पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, जाफ्राबाद/टेभूर्णी यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, अर्जदार संबधीत गावाचे रहिवाशी आहेत किंवा नाहीत याबाबत जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा..
ता. जाफ्राबाद २. ग्रामपंचायत कार्यालय, नगरपंचायत, जाफ्राबाद ग्राम महसूल अधिकारी भारज वू यांना जाहीर प्रकटनाच्या दोनप्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी गावात करुन प्रसिध्दी तसेच संबधीत गावाचे रहिवाशीआहेत किंवा नाहीत व जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.

**सही**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार जाफ्राबाद**

# भंडारा जिल्हा परिषद समोर राष्ट्रीय आरोग्य अभियान कॉन्ट्रॅक्ट अधिकारी व कर्मचारी यांचे काम बंद आंदोलन सुरू

## 17 दिवसापासून आंदोलनाकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे महाराष्ट्र प्रतिनिधी**

**भंडारा -** जिल्हा परिषद भंडारा समोर राष्ट्रीय आरोग्य अभियान कॉन्ट्रॅक्ट अधिकारी व कर्मचारी एकत्रिकरण समिती व एकता संघ महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा भंडाऱ्याच्या वतीने दिनांक 19 ऑगस्ट 2025 पासून आपल्या विविध मागण्यांकरिता आरोग्य सेवेतील कॉन्ट्रॅक्ट अधिकारी व कर्मचारी आपल्या न्याय मागण्या करता मागील 17 दिवसापासून काम बंद आंदोलन भंडारा जिल्हा परिषद समोर सुरू असून अजून पर्यंत जिल्हा प्रशासनाने त्यांची दखल घेतलेली नाही. त्यांना प्रोत्साहन देण्याकरता आज दिनांक 4 सप्टेंबर 2025 ला दुपारी 1 वाजता समाज प्रबोधनकार भावेश कोटांगले यांच्या समाज प्रबोधनाचा कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आलेला होता .कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय मनोज भाऊ कोटांगले यांना श्रद्धांजली अर्पित करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी पत्रकार संजीव भांबोरे यांनी कर्मचारी समस्येबाबत प्रत्यक्ष भेटून चर्चा केली असता कर्मचाऱ्यांनी सांगितले की ,राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कॉन्ट्रॅक्ट अधिकारी व कर्मचारी यांचे दिनांक 14 मार्च 2024 चे शासन निर्णयानुसार त्यांना



सेवेत समायोजन करण्यात आलेले नाही. प्रकाश आंबिटकर यांची प्रत्यक्ष भेटीदरम्यान त्यांनी 8 जुलै 2025 ला मुख्यमंत्री व सार्वजनिक आरोग्य विभाग सचिव क्रमांक 1 यांची मीटिंग लावणार असल्याचे सांगितले .या दरम्यान 10 व 11 जुलै 2025 ला मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन सुद्धा करण्यात आले .त्यावेळी 10 जुलै 2025 ला नामदार आरोग्य मंत्री यांनी राष्ट्रीय आरोग्य एकत्रिकरण समितीच्या समितीला भेटीदरम्यान समायोजन प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन दिले. परंतु कुठलाही निर्णय शासन स्तरावरून घेण्यात आलेला नाही. जवळपास भंडारा जिल्ह्यात 700 कर्मचारी काम बंद आंदोलनात सहभागी झालेले आहेत. आंदोलन यशस्वी करण्याकरता डॉक्टर सचिन लहाने, डॉक्टर आशिष माटे, डॉक्टर सुषमा गजभिये ,डॉक्टर श्रीकांत आंबेकर ,डॉक्टर भास्कर खेडेकर, डॉक्टर राजेंद्र सोनवणे, डॉक्टर राजू लांजेवार ,जितेंद्र अंबादे,प्रियंका मिश्रा, निलेश गिरी ,कोमल भाजीपाले ,शिवशंकर शेंडे, धनंजय कळंबे ,संदीप वासनिक, रवींद्र झोडे ,विलास गभणे, भूपेंद्र ब्राह्मणकर, रणजीत कोल्हटकर, मुकेश भेदे ,अभय कांबळे ,अनिता गवले, शुभांगी बांते , आभा उजवणे ,मुकेश बाबरे, ज्ञानेश्वर बालपांडे, तुषार पटले , विशाखा जांभुळकर ,नफीसा अली सय्यद ,दिशा शेंडे, शुभम फडर स्नेहा दहिवले, अजित टेंभेकर, रिता ईश्वरकर ,रसचलराज मस्के ,शीला माटे, अरुण रेहपाडे, मीना कुंभरे,भारत गणवीर ,सुषमा बांगडकर, जागेश्वर तिडके, ममता माजी, आंदोलन यशस्वी करण्याकरता सहकार्य करीत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सुरगाणा महाविद्यालयात वांङ्मय मंडळाच उत्साहात उद्घाटन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**




महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी व इंग्रजी विभागाच्या वांड्मय मंडळाचे उद्‌घाटन उत्साहात संपन्न झाले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिक्षण महर्षी सावित्रीबाई फुले, भाऊसाहेब हिरे, व्यंकटराव हिरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आदिवासी कवी भावेश बागुल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले कविता ही कल्पना विचार आणि प्रतिभा यांचा ताळमेळ बसला की निर्माण होते. कवी बागुल यांनी आदिवासी भागातील लोकांचे जीवन शेती, मातीतील प्रश्न कवितेच्या ओळीत मांडले कासरा, नुकसान,वाघूर,पातरी,संसद,सुनस वाटा मागते ह्या कवितेत आदिवासी भागातील शेतकऱ्यांची व्यथा,वेदना, संसारीक जीवन, संस्कृती मराठी व डांगी बोलीतील शब्दात कविता व गीतातून सादरीकरण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की भाषा मराठी किंवा इंग्रजी भाषा ही समृद्ध केली तर ज्ञान वृध्दींगत होत जाते.भाषेतील भावना, सौंदर्य,शब्द संग्रह मराठी व इंग्रजी साहित्य,व्याकरण, भाषाचा योग्य ठिकाणी वापर केला पाहिजे असे आवाहन केले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख डॉ.चंद्रकांत पाटील, सुत्रसंचालन प्रा.केशव गावित यांनी केले तर आभार डॉ.सविता सिरसाट मानले.

यावेळी कार्यक्रमाला प्रा.सुरेश भोये,प्रा.बी.डी.धुम, प्रा.सुभाष कामडी,प्रा. कविता भोये, प्रा.कृष्णा गांगुर्डे,प्रा.जोपळे, कृष्णा देशमुख उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांसह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

# एक गाव एक गणपती घ्या माध्यमातून वाघी (खुर्द) येथे रक्तदान शिबीर संपन्न



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी. रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील वाघी खुर्द येथील नवयुवक गणेश मंडळाच्या वतीने एक गाव एक गणपतीची संकल्पना या नवयुवकांनी अंमलात आणत रक्तदान शिबिराचे माध्यमातून लोकांचा जीव जाण्यापासून वाचवता येईल यासाठी गजानन ब्लड बँक वाशिम यांनी रक्त संकलन करण्यासाठी सेवा दिली.या शिबिरासाठी गावातील सर्व लोकांनी सहकार्य केले. विशेष म्हणजे या रक्तदान शिबिरामध्ये हिंदू - मुस्लिम दोन्ही समाजातील लोकांनी रक्तदान करून एक आदर्श निर्माण केला त्यामुळे एकोपा निर्माण झाला. आणि गावातही एक गाव एक गणपती ही संकल्पना खऱ्या अर्थाने अमलात आली.आणी नवयुवक यांनी हा एकीचा उपक्रम आणी समाजपयोगी कार्यक्रमाचे आयोजन केले. त्याबद्दल समाजातील सर्वच लोकांनी उपक्रमाचे कौतुक केले.या शिबिरात अनेक युवकांनी रक्तदान केले.

# मोरे वस्तीकडे जाणाऱा पुल बनला धोकादायक, मनसेचा आंदोलनाचा इशारा

जामखेड : जामखेड शहर नगर परिषद क्षेत्रातील वार्ड क्र. २ व ३ मधील मोरे वस्ती परिसरातील पुलाची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असून, नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यात या पुलावरून रोज शालेय विद्यार्थी, शेतकरी व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने प्रवास करत असतात पुलाच्या दोन्ही बाजूंना भेगा पडल्या असून लोखंडी सळई बाहेर आलेल्या दिसतात. त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता आहे. या धोकादायक परिस्थितीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. सात जून २०२३ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पुल दुरुस्तीबाबत निवेदन देण्यात आले होते. मात्र आजतागायत त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पुन्हा एकदा नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात तातडीने पुल दुरुस्तीची कामे सुरू करावीत, अन्यथा मनसेला तीव्र आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. हे निवेदन मनसेचे तालुकाध्यक्ष प्रदीप टापरे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी तालुका उपाध्यक्ष सनी सदाफुले, शहर उपाध्यक्ष अनिल पाटील, तसेच कार्यकर्ते बंटी पाटील, आकाश साठे, गणेश जोशी, अतुल भोंडवे, बापू आरेकर उपस्थित होते. मनसे पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला स्पष्ट केले की – “पुलाची दुरुस्ती ही केवळ विकासाची बाब नसून जनतेच्या जीवितरक्षणाशी थेट संबंधित आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांसह रस्त्यावर उतरून आंदोलन छेडावे लागेल,” असा इशारा मनसे ने दिला आहे .



श्री कृष्ण नगर, मोरे वस्ती परीसरात मोठ्या प्रमाणात रहदारी वाढली आहे. याठिकाणी जाणारा रस्त्याची देखील दुरावस्था झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून हा पुल खचला होता मात्र मागिल वर्षी पुलाची एक बाजु पुर्णपणे पडली आहे. पावसाच्या पाण्याणे हा पुल वाहुन जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांनी देखील मनसेच्या या भूमिकेला पाठिंबा दर्शविला असून, पावसाळ्याच्या तोंडावर या पुलाची दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा मोठा संघर्ष उभा राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# दुर्गम भागातील कल्पक शिक्षक सचिन ठाणगे यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे**

अहिल्यानगर जिल्हा परिषदेचा “जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५” जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रे खुर्द (ता. पारनेर) येथील उपक्रमशील शिक्षक सचिन बबनराव ठाणगे यांना जाहीर झाला आहे. शिक्षक दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार ठाणगे सरांना मिळाल्याने शिक्षण क्षेत्रासह समाजात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

सचिन ठाणगे हे पारनेर तालुक्यातील तिखोल येथील रहिवासी आहेत. ग्रामीण व दुर्गम भागातील धोत्रे खुर्द शाळेत ते कार्यरत असून, येथील विद्यार्थी मेंढपाळ व मजुरी करणाऱ्या पालकांची मुले आहेत. या विद्यार्थ्यांना शाळा हेच दुसरे घर वाटावे म्हणून त्यांनी “मिशन आपुलकी” या उपक्रमातून शाळेचे बालउद्यान उभारले. टाकाऊ वस्तूंचा सुयोग्य वापर करून शाळेचा कायापालट घडवून आणला. परिणामी शाळा आज परिसरातीलच नव्हे तर जिल्ह्याबाहेरील शिक्षणप्रेमी, अधिकारी व लोकप्रतिनिधींसाठी आकर्षणाचे केंद्र बनली आहे.

**शाळेचा वाढता आलेख**

फक्त १७ विद्यार्थ्यांनी सुरू झालेल्या या शाळेत आज ५० हून अधिक विद्यार्थी शिकत आहेत. शाळेतील शिक्षणाची गुणवत्ता पाहून इंग्रजी माध्यमातील तसेच इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचेही प्रवेश होत आहेत. शहरी शाळांना तोडीस तोड असे शिक्षण ग्रामीण भागात मिळावे, यासाठी ठाणगे सर सातत्याने प्रयत्नशील आहेत.



विविध उपक्रम आणि प्रयोगशील शिक्षण ठाणगे सरांनी शालेय शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला. हस्ताक्षर स्पर्धा, गणित-विज्ञान प्रदर्शन, पाढे पॉकेटकार्ड, वाचन कट्टा, शैक्षणिक सहली, वृक्षारोपण, लेझीम पथक अशा अनेक उपक्रमांचा विद्यार्थ्यांमध्ये समावेश आहे. तसेच *‘मोडी लिपी’*चे ज्ञान विद्यार्थ्यांना देऊन त्यांनी इतिहासाचे संवर्धन केले.

विद्यार्थ्यांना जर्मन भाषेचे प्राथमिक ज्ञान यूट्यूबच्या माध्यमातून देण्याचा आगळावेगळा उपक्रम त्यांनी राबवला. या उपक्रमाची दखल राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी घेतली व शिर्डी येथील कार्यशाळेत शाळा व शिक्षकाचा गौरव केला. जिल्हाधिकारी सिद्धराम सालिमठ यांनी मोडी लिपी उपक्रमाची, तर जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दिल्ली येथील ग्रामीण समस्यांवरील कार्यशाळेसाठी ठाणगे सरांची निवड करून त्यांच्या कार्याला मान्यता दिली आहे.

**विद्यार्थ्यांचे यश आणि गौरव**

धोत्रे खुर्द शाळेतील विद्यार्थी दरवर्षी विविध स्पर्धांमध्ये दैदिप्यमान यश संपादन करतात. विराज सुभाष सासवडे या विद्यार्थ्याच्या हस्ताक्षराची दखल तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः घेतली आणि शिक्षक-विद्यार्थ्यास सन्मानपूर्वक निमंत्रण दिले.

**व्यापक दखल आणि अभिनंदनाचा वर्षाव**

ग्रामीण भागातील शाळेला जिल्ह्याबाहेर नावारूपास आणणाऱ्या ठाणगे सरांच्या कार्याचा गौरव आमदार काशिनाथ दाते व खासदार निलेश लंके यांनी केला आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी कांतिलाल ढवळे, केंद्रप्रमुख उत्तम फंड, विविध शिक्षक संघटना, ग्रामस्थ यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. “पुरस्कारासाठी काम करणारे बरेचजण असतात; मात्र कामातूनच पुरस्कार मिळवणारे शिक्षक सचिन ठाणगे सर आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत,” असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.





दैनिक युवक आधार - रायगड जिल्हा परिषद उर्दू शाळा नेरळ रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या नेरळ शहरात एक उर्दू शाळा आहे. त्यात एकूण १९६ मुले शिकतात. या शाळेत १९६ मुले शिकतात ज्यामध्ये काही मुलांना प्रती/पुस्तके मिळत नाहीत. रहमान फाउंडेशन ममदापूर (खानका ए नोमानी) कुठेतरी ७६ मुलांना प्रती/बायाज देण्यात आले ज्यामध्ये रहमान फाउंडेशनचे परवेझ भाई आणि २ साथीदार देखील होते नेरळ शहरातील सलीम भाई तांबोळी आणि रफिक भाई अत्तार आणि अलकाश भाई मुल्ला यांनी शाळेसाठी आपला मौल्यवान वेळ दिला आहे आणि नेहमीच देत राहतात नेरळ उर्दू शाळेचे शिक्षक शानवाज ढोंगी सर, जिलानी सर, अबुबकर सर आणि ३ महिला शिक्षिका देखील उपस्थित राहिल्या आणि मुलांना प्रती देण्यात मदत केली नेरळ उर्दू शाळेचे शिक्षक खूप मेहनत आणि परिश्रमपूर्वक काम करतात, त्यामुळे या शाळेतील मुलांची संख्या हळूहळू वाढत आहे. उर्दू शाळांचे शिक्षक मुलांना शिकवण्यासोबतच त्यांच्या खाण्यापिण्याची आणि आरोग्याचीही खूप काळजी घेतात.

आवडते मला माझी शाळा
सकाळी भरतो गोपाळाचां मेळा
शाळेत माझ्या भरपूर खेळ
मुलाचां बसला त्याच्याशी मेळ

आनंदाने येतात सगळी मंडळी
डब्यात खाऊ भाजी पोळी
मला भरवतात आवडीने घास
मी शिक्षिका त्यांची खास

मुलांचा माझ्या अभ्यास छान
शाळेला पहिल्या क्रमांकाचा मान
आवडत नाही त्यांना सुट्टी
जमली माझ्या सोबत गट्टी



**सौ. शिल्पा चद्रंकांत निमकर.**
**घाटकोपर मुंबई.**

## घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा बनलं मटक्याचं मुख्यालय – पोलिस कुठं आहेत?

**अवैध शिक्षण’ सुरूच; पोलिस ठरले दुर्लक्ष करणारे गुरू?”**

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि.**
**महेश पेन्दोर**

सरकार आणि जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशीचे आदेश द्यावेत, तसेच संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा, चिखलवर्धा हे शिक्षणाचे नव्हे, तर गुन्हेगारीचा 'मॉडेल व्हिलेज' बनण्याच्या मार्गावर आहे. घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा गावात सध्या एक वेगळीच 'शाळा' सुरू झाली आहे. ही शाळा शिक्षणाची नाही, तर थेट जुगाराची आणि मटक्याची आहे. गावातील चार ठिकाणी दिवसाढवळ्या मटक्याचे अड्डे सुरू आहेत. या धोकादायक 'शाळे'मध्ये लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत अनेकांची हजेरी वाढत आहे.

या सर्व प्रकाराला स्थानिक पोलिसांचे मौन समर्थन मिळत असल्याचा आरोप होत आहे. पोलीस स्टेशनपासून काही अंतरावरच हा अवैध धंदा बिनधास्त सुरू आहे, तरीही पोलीस फक्त बघ्याची भूमिका घेत आहेत. अनेक तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढले आहे.

एका चिंतातूर पालकाने आपली व्यथा मांडताना सांगितले, "आमच्या मुलांच्या डोळ्यांसमोर हे सर्व चाललं आहे. उद्याचं त्यांचं भविष्य अंधारात आहे."

या अवैध धंद्यामुळे गावात भीतीचे आणि संतापाचे वातावरण आहे.

# सिद्धिविनायक गणेश मंडळ माळीवाडा पाथरी आयोजित मोफत आरोग्य शिबिर व भव्य रक्तदान शिबीर.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा ग्रामीण प्रतिनिधी सिद्धांत चिंचाने. परभणी.**

सिद्धिविनायक गणेश मंडळ व वरद हॉस्पिटल पाथरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 03/09/2025. रोजी माळवाडीतील गजू आणि गरजवंत नागरिकांकरिता भव्य आरोग्य शिबिर घेण्यात आले या आरोग्य शिबीर शिबिरामध्ये विविध आजारावर मार्गदर्शन करण्यात आले व औषध उपचार करण्यात आले.

ग्रामीण भागामध्ये असणाऱ्या आरोग्य प्रश्नांवर यावेळी विविध मान्यवरांनी डॉक्टर मंडळींनी अगदी व्यवस्थित रित्या मार्गदर्शन केले आणि आपल्या आरोग्य कसे उत्तम राखता येईल याविषयी सखोल मार्गदर्शन केले. शेतीची कामे करताना शेतीमध्ये फवारणी करताना आरोग्य विषयी कोणती काळजी घ्यावी याविषयी शेतकऱ्यांना अगदी छान मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच त्यानंतर व्य अशा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये सिद्धिविनायक गणेश मंडळ यांच्या सर्व पदे अधिकार्यांनी रक्तदान करून एक समाजापुढे आदर्श निर्माण केला ईश्वर सेवा जर करायची असेल तर जनसेवा रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा आहे असे म्हणून आपण समाजाप्रती काहीतरी देणे लागतो यासाठी आपण वर्षातून किमान एक वेळा तरी रक्तदान करावे.

सिद्धिविनायक गणेश मंडळ दरवर्षी विविध उपक्रमाचे आयोजन करून समाजामध्ये आपली आणि आपल्या गणेश मंडळाची मान उंचावेल यासाठी नक्कीच प्रयत्न करत असते.

शेवटी सर्व गणेश मंडळांनी सिद्धिविनायक गणेश मंडळ यांचे आभार व्यक्त केले.



# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकाची भूमिका किती प्रभावी

शिक्षकांना पालकांच्या बरोबरीचे मानले जाते. पालकांनंतर, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक सर्वात जास्त जबाबदार असतात. असे म्हटले जाते की देशाच्या भावी पिढ्या प्रगती करतील की विनाश, या दोन्ही गोष्टी शिक्षकाच्या भूमिकेवर अवलंबून असतात. कारण, ज्ञानाधारित अध्यापनाद्वारे, शिक्षक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता ओळखून त्यांना सक्षमपणे सुधारतो. दुसरीकडे, जर एखादा शिक्षक त्याच्या भूमिका आणि पदाची प्रतिष्ठा विसरला तर त्याचे परिणाम संपूर्ण समाजाला दीर्घकाळ भोगावे लागतात. शिक्षक हे गुणांची खाण असल्याचे म्हटले जाते, ज्यामध्ये विषय ज्ञान, संवाद कौशल्य, अध्यापनाची आवड, सकारात्मक दृष्टिकोन, सर्जनशील विचारसरणी, संशोधक, संयमी, चारित्र्यवान, सत्य, बुद्धिमान, मेहनती, सहनशील, मृदुभाषी, वेळेचे मूल्य जाणणारा, कोणत्याही भेदभावाशिवाय सर्व विद्यार्थ्यांकडे समानतेने पाहणारा, त्यांची कौशल्ये समजून घेणारा, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नेहमीच संघर्ष करणारा हे असे गुण शिक्षकात असतात. हे गुण खऱ्या शिक्षकाची ओळख आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी आदर्श मार्गदर्शक, प्रेरणेचे स्त्रोत आणि मित्र असतात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांच्या नैतिक आणि चारित्र्य विकासात शिक्षकांचे मोलाचे योगदान असते. म्हणजेच, शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षित करतातच सोबत त्यांना चांगले जीवन जगण्यास सक्षम आणि त्यांना सुजान नागरिक बनवतात. शिक्षणाचा खरा अर्थ केवळ पुस्तकी ज्ञान किंवा तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे असा नाही, तर ती एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक क्षमतांचा सर्वांगीण विकास होतो. ज्ञान आणि अनुभवाद्वारे एखाद्या व्यक्तीला बुद्धिमान, संवेदनशील आणि समाजासाठी उपयुक्त बनवणे हा त्याचा उद्देश आहे, जेणेकरून तो जीवनातील समस्या सोडवू शकेल आणि एक सुसंस्कृत नागरिक बनू शकेल.

एक काळ असा होता जेव्हा शिक्षण हे समाजसेवेचा एक भाग होते, तेव्हा समाजसुधारक शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी आणि समाजात एक नवीन क्रांती घडवून आणण्यासाठी संघर्ष करत असत, पण आजच्या व्यापारीकरणाच्या युगात शिक्षणाकडे व्यवसाय म्हणून पाहिले जाते. देशातील उच्च सरकारी अधिकारी, नेते, कर्मचारी आणि स्वतः सरकारी शिक्षकही त्यांच्या मुलांना महागड्या खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण देण्यास प्राधान्य देतात. कारण ते कदाचित सरकारी शिक्षण व्यवस्थेवर समाधानी नसतील आणि श्रीमंत कुटुंबातील मुले थेट परदेशात शिक्षण घेण्यास प्राधान्य देतात. दरमहा एक लाख ते दीड लाख रुपये पगार मिळवणारे सरकारी शिक्षकही त्यांच्या मुलांना खाजगी शाळांमध्ये शिकवतात, असे का घडते? सरकारी शिक्षकांना त्यांच्या स्वतःच्या शिक्षण व्यवस्थेवर विश्वास नाही का? सर्वात पवित्र मानल्याजाणाऱ्या शिक्षक वर्गातही अनेक घृणास्पद घटना शिक्षण जगताला कलंकित करत आहेत, आजही देशातील ही परिस्थिती फारशी बदललेली नाही. सध्या महाराष्ट्र राज्यातही सरकारी शालार्थ आयडी



घोटाळा चर्चेत आहे. शेकडो सरकारी अनुदानित शाळांमधील शिक्षकांचे खोटे आकडे दाखवून वर्षानुवर्षे पगाराच्या नावाखाली सरकारचे कोट्यवधी रुपये लुटले जाण्याच्ये धंधे सर्रास सुरु होते.

शिक्षणातही भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे, त्याबद्दल सर्वांना माहिती आहे, पण त्याविरुद्ध कोणीही बोलू इच्छित नाही. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षक भरतीच्या नावाखाली भ्रष्टाचाराच्या बातम्या आपण अनेकदा पाहतो, ऐकतो आणि वाचतो. ही भरती एका गठित समितीद्वारे केली जाते, विद्यापीठाच्या कुलगुरू आणि राज्य सरकारच्या मंत्र्यांकडे तक्रार करूनही, सुधारणेच्या नावाखाली फक्त आश्वासने ऐकू येतात. आतापर्यंत सरकारने या भरतींची पूर्ण जबाबदारी स्वतः कडे घेतलेली नाही. अशा व्यवस्थेत, पात्रता असूनही प्राध्यापक होण्याचे गरीब आणि प्रामाणिक लोकांचे स्वप्न संघर्ष आणि भ्रष्टाचारात दबले जाते.

देशातील काही आर्थिकदृष्ट्या सक्षम खाजगी शैक्षणिक संस्थांची स्थिती समाधानकारक आहे, परंतु बहुतेक खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये, कदाचित सर्वात शिक्षित शिक्षक सर्वात कमी पगारावर काम करतात. अनेक खाजगी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षकांना रोजंदारी कामगारापेक्षा कमी वेतन मिळते. यासोबतच, एका पदावर काम करताना, त्यांना संस्थेची इतर कामे देखील करावी लागतात. या क्षेत्रातील बेरोजगारीचा दरही सर्वाधिक आहे. आजच्या महागाईच्या काळात, २५००-३००० रुपये दरमहा पगार काहीच महत्त्वाचा नाही. तरीही मोठ्या संख्येने शिक्षक या पगारावरही काम करत आहेत, ही आपल्यासाठी खूप लाजिरवाणी आणि दुःखाची बाब आहे. अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये, संस्थांचे मालक शिक्षकांशी वाईट वागतात आणि त्यांना त्यांच्या वैयक्तिक कामात व्यस्त ठेवतात. अनेक संस्थांमध्ये शिक्षकांचे पगार महिने आणि वर्षे प्रलंबित ठेवले जातात, काही ठिकाणी पदोन्नती थांबवल्या जातात आणि मानसिक छळही केला जातो, म्हणूनच शिक्षकांमध्ये आत्महत्यांच्या घटनाही वाढत आहेत.

शिक्षणाच्या जगात आता विद्यार्थ्यांचे एक नवीन रूप दिसून येत आहे; लहान मुले देखील त्यांच्या शाळेच्या बॅगमध्ये नको असलेल्या वस्तू घेऊन फिरताना आढळतात, ज्यामध्ये अंमली पदार्थ, घातक शस्त्रे देखील असतात. पूर्वी, शिक्षक चुकांसाठी विद्यार्थ्यांना मारहाण करत असले तरी पालक त्याला काही विशेष आक्षेप घेत नव्हते. आता, चुकांसाठी विद्यार्थ्यांना मारहाण करणे तर दूरच, त्यांना फटकारणे देखील शिक्षकांना गुन्हा वाटू लागते. काही महिन्यांपूर्वी, पंजाब आणि हरियाणामध्ये, शालेय विद्यार्थ्यांनी त्यांच्या मुख्याध्यापकांची चाकूने वार करून हत्या केली. आता शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांना धमकावल्याच्या घटनाही सातत्याने समोर येत आहेत. आपल्या देशात बालगुन्हेगारांचा ग्राफ झपाट्याने वाढत आहे. पालक व्यस्तता दाखवत आहेत, शिक्षक व्यावसायिक होत आहेत, मग देशातील पिढी गुन्हेगारीच्या दलदलीत अडकणे अपरिहार्य आहे. महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, २०२२ सालच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, अल्पवयीन गुन्हेगारांच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे, त्यानंतर मध्य प्रदेश, राजस्थान, तामिळनाडूचा क्रमांक लागतो.

लोक म्हणतात की सरकारी शाळांची अवस्था वाईट आहे, मग तिथल्या शिक्षकांना पगार तर भरपूर मिळतो, तर शैक्षणिक गुणवत्ता का सुधारत नाही. दुसरीकडे, देशातील बहुतेक खाजगी संस्थांमध्ये शिक्षकांचे पगार खूपच कमी आहेत, मग अशा परिस्थितीत देशाची शिक्षण व्यवस्था कशी मजबूत होईल? शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर कसा वाढेल? खाजगी संस्थांमध्ये, कमी पगाराचा शिक्षक देशाचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी मनापासून चिकाटीने आणि मेहनतीने कसा काम करू शकतो? जेव्हाकी त्या शिक्षकाचा वर्तमान स्वतः अंधारात आहे. देशातील बहुतेक ठिकाणी ही परिस्थिती आहे, हे सर्व पाहता, आजचा शिक्षक खरोखरच देशाच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार म्हणण्यास पात्र आणि सक्षम आहे का? केंद्रीय विद्यालय, आयआयटी, आयआयएम, एम्स सारख्या शैक्षणिक संस्था प्रत्येक गावाची, प्रत्येक शहराची गरज आहेत, प्रत्येक विद्यार्थ्याला कोणताही आर्थिक भेदभाव न करता समान दर्जाचे शिक्षण मिळालेच पाहिजे.

बिहारमधील खाजगी कोचिंग सेंटरचे प्रसिद्ध शिक्षक खान सर यांनी अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, देशातील सरकारी शिक्षण व्यवस्था अतिशय वाईट परिस्थितीतून जात आहे, ज्याचा पुरावा म्हणजे खाजगी कोचिंग सेंटर विद्यार्थ्यांनी खचाखच भरलेले आहेत. शिक्षणासाठी खाजगी कोचिंग सेंटर्सवरील विद्यार्थ्यांचे अवलंबित्व प्रचंड वाढत आहे. सर्व विद्यार्थ्यांना नाममात्र पदवी मिळाली तरी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास त्याच्या उद्दिष्टापासून खूप दूर राहील. आपण आपल्या आयुष्याचा सर्वात मोठा भाग शिक्षणात म्हणजे आपले शरीर, मन आणि पैसा खर्च करतो. जर ते शिक्षण आपल्याला चांगले राहणीमान प्रदान करण्यास सक्षम असल्याचे सिद्ध झाले तर ते चांगले आहे, अन्यथा जीवन एक संघर्षच बनून राहते, जे आपण बघतच आहोत. जोपर्यंत शिक्षकांना समाजसुधारक म्हणून त्यांची भूमिका समजत नाही, तोपर्यंत देशाच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित होत राहतील.

# अनिता साबळे सेवानिवृत्त

**हातगाव / प्रतिनिधी**
------

शेवगाव तालुक्यातील कांबी गावच्या मूळच्या रहिवाशी असणाऱ्या अनिता विकास लोखंडे/साबळे यांनी परभणी जिल्हा परिषदेमध्ये लघुसिंचन जलसंधारण विभागातून २५ वर्षाच्या सेवेनंतर वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाली. त्यांचा परभणी येथे नुकताच जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सेवापूर्ती कार्यक्रम संपन्न झाला आहे .सौ लोखंडे/ साबळे यांनी सुरुवातीला हिंगोली जिल्हा परिषदेच्या शिक्षण(प्राथमिक) विभागात २ वर्ष त्यानंतर परभणी येथील पंचायत समितीमध्ये १० वर्ष त्यानंतर परभणी जिल्ह्यातीलच ताडकळस येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये १० वर्ष व शेवटचे ३ वर्ष परभणी जिल्हा परिषदेमध्ये लघुसिंचन – जलसंधारण विभागात आपल्या नोकरीची सेवा पूर्ण केली आहे. परभणी येथे नुकत्याच पार पडलेल्या या सेवापूर्ती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तेथील जिल्हा परिषदेचे कार्यालयीन अधिक्षक स्वामी हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून गजानन लोंढे, स्थापत्य जलसंधारणाचे चव्हाण यांचेसह महिला कर्मचारी बोशीकर, श्रीमती हजारे , भिसे यांच्यासह सौ अनिता यांची मुलगी डॉ. प्रियांका साबळे ,जावई डॉ.राहुल मालेकर, मुलगा अड. सुमित विकास साबळे ,पती विकास तुळशीराम साबळे यांच्यासह इतरही अधिकारी ,कर्मचारी व नातेवाईक उपस्थितीत होते.



# दिनकर झेंड यांचा अपघाती मुत्यु

**भाविनिमगाव / प्रतिनिधी**
--------------



भाविनिमगाव ( ता. शेवगाव ) येथील रहिवासी दिनकर नाना झेंड ( वय ७४ वर्ष ) यांचा गुरुवार रोजी अपघाती मुत्यु झाला. ( शहर टाकळी येथील व्यावसायिक सोमनाथ व अरुण वैद्य यांच्या मालकीच्या इमारतीच्या स्लॅबच्या पडदी अंगावर पडुन झेंड यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने ते जाग्यावरच गतप्राण झाले. ) काही कामानिमित्त ते सकाळी शहर टाकळी येथे गेले होते. तेव्हा वैद्य यांच्या दुकानासमोर उभे असताना हि दुर्घटना घडली. पोस्ट मार्टम नंतर सायंकाळी ५ वाजता त्यांच्या वर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, नातू असा परिवार आहे. साईनाथ झेंड यांचे ते वडील होते.

# प्रा.बिभिषण चाटे यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्कार जाहीर

**शिरूर कासार / प्रतिनिधी**
-----------

बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा



आदर्श शिक्षक पुरस्कार ज्येष्ठ निवेदक, सूत्रसंचालक आणि वृत्तपत्र लेखक प्रा.बिभिषण चाटे यांना जाहीर झाला असून; मान्यवर पाहुण्यांच्या शुभहस्ते बीड येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजन समितीच्या वतीने आज येथे देण्यात आली. प्रा.बिभिषण चाटे यांनी गत २६ वर्षापासून अविरतपणे शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत राहून तसेच विविध कार्यक्रमांचे सुंदर सूत्रसंचालन, निवेदन तसेच वृत्तपत्र लेखन करून सामाजिक बांधिलकीची प्रमाणिक भूमिका निभावली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या मान्यतेने महविद्यालय क्षेत्रातून ही निवड करण्यात आल्याचे संयोजन समितीचे अध्यक्ष नितीन क्षीरसागर यांनी सांगितले.

# दोन तप अविरत ज्ञानदान करणा-या कर्तव्यनिष्ठ शिक्षिका - अर्चना गिरवकर

**पैठण :** आयुष्यात भावनेपेक्षा कर्तव्य किती मोठे असते नुसती स्वप्न पाहून चालत नाही तर ती स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी आयुष्यात कडी मेहनत करावी लागते. तेव्हाच आपल्या आयुष्याला बहरलेली बाग पाहायला मिळते. स्वप्न हे असे साधन आहे जे आपल्याला जीवन जगण्याचे उद्दिष्ट देते. स्वप्न हे एका ध्येयासारखे असते आणि कोणत्याही ध्येयाशिवाय आपण आपल्या आयुष्यात काहीही बनू शकत नाही. आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर शाळेतील विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत आणि पॅटर्नमध्ये शिक्षिका श्रीमती अर्चना गिरवकर यांचा मोलाचा वाटा आहे. ध्येयवादाने झपाटलेले कर्तव्यदक्ष, कर्मनिष्ठ, विद्यार्थी प्रिय, विलोभनीय सुसंस्कारित सर्व गुणसंपन्न, सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या , चुकलेल्या विद्यार्थ्यांनाही वाट दाखवणारे प्रसंगी कठोर तर कधी माया ममतेने समजून सांगणाऱ्या. माणुसकीचा ओतप्रोत झरा असणाऱ्या गुरु या पदाला साजेशा काम करून आपल्या पाऊलखुणा आर्य चाणक्य संस्कार केंद्रातील आदर्श शिक्षिका म्हणजे अर्चना वसंत गिरवलकर विद्यार्थी प्रिय, शिस्तप्रिय, आणि विद्यार्थी चुकला तर त्याची खरडपट्टी काढणारे, त्याला जीवनाचा खरा मार्ग सांगणारे व चुकलेल्या वाटेवरच्या अनेक विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना उच्च ध्येय पदापर्यंत पोहोचवणारे खरंच आपण शिक्षिका आहात. होतात आणि पुढे राहतालच. विद्यार्थी तुमचे ऋण कधीच फेडू शकणार नाहीत माझा मुलगा आदिराज



अविनाश गर्डे यालाही आपण अनमोल सल्ला देऊन त्याचे जीवन घडविण्यात आपला खूप मोलाचा वाटा आहे. सर्वत्र नाव गाजले आणि उपक्रमशिल शाळा म्हणून प्रसिद्ध असलेल्या आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर मधील कर्तव्यदक्ष अर्चना वसंत गिरवलकर निर्मोही .... संघर्षशील... प्रयत्नशील.... कार्यतत्पर... अभ्यासू... आणि आदर्श.. सामर्थ्यशली..... कर्तृत्ववान" माणसात देव शोधणारा डोळस कर्मयोगी... , सर्वगुणसंपन्न, प्रेमळ, मित्रासाठी चंदनाप्रमाणे झिजाणारा, फुला प्रमाणे सुगंध देणारा, वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा, माया, ममता, करूणेने ओतप्रोत भरलेला सच्चा दिलदार मित्र, ज्यांच्यात पृथ्वीची उदारता, सागराची अथांगता, चंदनाची शीतलता, फुलाची मधुरता कायम बहरत असते. ऊन, वारा, थंडी, पाऊस, वादळे अंगावर घेत विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी स्वतःच्या जीवनात अनेक संकटे झेलत कुटुंबासोबत, नातेवाईका , विद्यार्थ्यासोबत उत्सवांमध्ये आनंद साजरा करत कर्तव्यावर स्वार होऊन आपलं आयुष्य जगणारा खरा हाडामासाच्या शिक्षिका म्हणून गिरवलकर यांचे नाव येते. असामान्य, प्रेरणादायी व्यक्तिमत्व होय. विद्यार्थ्यांना, तरुणांना योग्य असे मार्गदर्शन करुन त्यांना जीवनाच्या खरा मार्ग दाखविणारे एक आदर्श शिक्षिका. काहीही झाले तरी डोक्यावर बर्फ आणि तोंडामध्ये साखर ठेवून आतापर्यंतचे आयुष्य जगले. वेळप्रसंगी रागावले परंतु मनात कधीच राग, व्देश, मत्सर बाळगला नाही. हे गिरवलकर यांचे वेगळेपण आहे.

शैक्षणिक साहित्यातून ज्ञानाचा दिवा पेटवणा-या शिक्षिका –
एकीकडे वर्गात विद्यार्थ्यांना कठीण अशा विज्ञान सहज सोप्या पद्धतीने समजावे या करीता विविध शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने विद्यार्थ्याना सोप्यात सोपं विषय वाटावा म्हणून प्रयत्न असतो. शिक्षक हा कधीच एका साच्यात अडकलेला नसतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे अर्चना गिरवकर असून त्यांनी आपल्या साहित्यातूनही विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याचा मानस बाळगला आहे. हजारो विद्यार्थ्यांना विज्ञान भाषेची गोडी लावलीच आवड निर्माण केली. आजकालच्या स्पर्धेच्या युगात स्टेट बोर्डाच्या विद्यार्थी इतर बोर्डांच्या तुलनेत कमी पडतात की काय? ही केवळ भीती बाळगून चालणार नाही म्हणून त्यासाठी काहीतरी केले पाहिजे ही जिद्द उराशी बाळगून त्यांनी गेली २४ वर्षे ज्ञानदानाचे कार्य चालू आहे